# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः26.04.2025** **वारःशनिवार**

1. पाकिस्तानी नागरिकांची ओळख पटवून त्यांना तात्काळ परत पाठवण्यासाठी पावलं उचलण्याच्या केंद्रीय गृहमंत्र्यांच्या सर्व राज्यांना सूचना
2. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबद्दल कुठलंही अवमानकारक वक्तव्य न करण्याची सर्वोच्च न्यायालयाची राहुल गांधी यांना ताकीद
3. महानगरांमधील वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी एकात्मिक महानगर वाहतूक प्राधिकरणची स्थापना करण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या सूचना आणि
4. ज्येष्ठ शास्त्रज्ञ तसंच इस्रोचे माजी अध्यक्ष के. कस्तुरीरंगन यांचं निधन

**अमित शहा-फडणवीस**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानबरोबरचा सिंधु जल वाटप करार स्थगित करण्याचा निर्णय भारतानं घेतला आहे. या संदर्भात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक घेतली. शहा यांच्या निवासस्थानी झालेल्या या बैठकीला परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस जयशंकर, केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

दरम्यान भारतात आलेल्या पाकिस्तानी नागरिकांची ओळख पटवून त्यांना तात्काळ परत पाठवण्यासाठी पावलं उचलण्याच्या सूचना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सर्व राज्यांना दिल्या आहेत. या संदर्भात त्यांनी सर्व मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली.

राज्यातल्या पाकिस्तानी नागरिकांची यादी तयार झाली आहे. त्यांनी तात्काळ देश सोडावा यासाठी प्रयत्न केले जातील, दिरंगाई झाल्यास कारवाई केली जाईल, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. यासंदर्भात काल माध्यमांशी बोलताना फडणवीस म्हणाले........

**भारत सरकार ने पाकिस्तानी नागरीक जे भारता मध्ये आहे, त्यांचा व्हिसा रद्द केलेला आहे. आणि त्यांना तात्काळ निघून जायला सांगितलेल आहे, या संबंधी असे कोण कोण नागरिक महाराष्ट्रात आहेत त्यांची यादी तयार झालेली आहे, आम्ही मॉनिटरिंग करतो आहे, सगळ्या पोलीस स्टेशन्सला देखिल संगितलेला आहे, तात्काळ मध्ये त्यांनी हा देश सोडून गेल पाहिजे, या दृष्टीने पूर्ण मॉनिटरिंग केल जाईल, आणि जर कोणी त्यात दिरंगाई केली तर त्याच्या वर कायदेशीर करवाई केली जाईल, कुठल्याही परिस्थितीत पाकिस्तानी नागरिक व्हिसा कॅन्सल झालेला आहे असे या भारतात राहणार नाही, या महाराष्ट्रात राहणार नाही, या संदर्भात पूर्ण काळजी आम्ही घेत आहोत.**

**पर्यटक**

काश्मिरमध्ये गेलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांना परत राज्यात आणण्यासाठी राज्य सरकार प्रयत्न करत आहे. काल तिसऱ्या विशेष विमानातून 232 प्रवासी मुंबईत दाखल झाले. पहलगाम हल्ल्यानंतर आतापर्यंत सुमारे 800 पर्यटक महाराष्ट्रात परतले आहेत.

**एकनाथ शिंदे**

पहलगाममध्ये पर्यटकांवर हल्ला होत असताना स्वतःच्या जीवाची पर्वा न करता पर्यटकांच्या रक्षणासाठी धावून जाणाऱ्या सय्यद आदिल हुसैन शाह या स्थानिक युवकाचा देखील या हल्ल्यात मृत्यू झाला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वैयक्तिकरित्या सय्यदच्या कुटुंबियांना पाच लाख रुपयांची मदत केली आहे.

**पंतप्रधान**

केंद्र सरकारच्या विविध कार्यालयांमध्ये नव्यानं रुजू होत असलेल्या 51 हजारांहून अधिक युवा अधिकारी कर्मचाऱ्यांना आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं नियुक्ती पत्र वितरित करण्यात येणार आहेत. यावेळी पंतप्रधान नवनियुक्त युवा कर्मचाऱ्यांशी संवाद साधणार आहेत. देशभरात 47 ठिकाणी हा रोजगार मेळावा होणार आहे.

**स्वातंत्र्यवीर सावरकर**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्याबद्दल कुठलंही अवमानकारक वक्तव्य करू नका अशी ताकीद सर्वोच्च न्यायालयानं विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना दिली आहे. भारत जोडो यात्रेदरम्यान अकोल्यात झालेल्या सभेत त्यांनी सावरकर यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केलं होतं. त्यासंदर्भात न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि मनमोहन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू आहे. यापुढे स्वातंत्र्य सैनिकांबद्दल अशाप्रकारची वक्तव्य केली तर न्यायालय स्वतःहून कारवाई करेल, असा इशाराही खंडपीठानं दिला. यापुढे अशी वक्तव्य करणार नाही, असं आश्वासन राहुल गांधी यांचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी न्यायालयाला दिलं. त्यानंतर न्यायालयानं गांधी यांना बजावलेल्या समन्सला स्थगिती दिली. सर्वोच्च न्यायालयाने स्वातंत्र्यवीर सावरकरांवरून राहुल गांधी यांना लगावलेल्या चपराकीनंतर ते यापुढे स्वातंत्र्यसैनिकांचा अपमान करणार नाहीत, अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.

**राज्यपाल**

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी काल मुंबईतल्या कुलाबा इथं आर्चबिशप हाऊसमधल्या प्रार्थनासभेत रोमन कॅथोलिक चर्चचे प्रमुख दिवंगत पोप फ्रान्सिस यांना श्रद्धांजली वाहिली. या प्रार्थना सभेला मुंबईचे आर्चबिशप जॉन रॉड्रिग्स, विविध धर्मांचे प्रतिनिधी आणि मुंबईतील विविध देशांचे वाणिज्यदूत उपस्थित होते. या पार्श्वभूमीवर आज देशभरात दुखवटा पाळण्यात येणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यासाठी व्हॅटिकन सिटीमध्ये पोहोचल्या आहेत.

**परिवहन**

महानगरांमधील वाहतूक कोंडीची समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी एकात्मिक महानगर वाहतूक प्राधिकरणची स्थापना करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिल्या. या प्राधिकरणाचा कायदा करण्यापूर्वी त्यावर जनतेच्या सूचना आणि हरकती घेऊन अंतिम निर्णय घेण्याचंही त्यांनी सूचित केलं. यासंदर्भात मुंबईत आयोजित बैठकीत ते बोलत होते.

**वेव्ज**

प्रसार भारतीची वेव्हज् ही ओटीटी वाहिनी आणि मुंबईत येत्या 1 ते 4 मे या कालावधीत होत असलेल्या वेव्ज म्हणजेच जागतिक ऑडिओ व्हिज्युअल मनोरंजन शिखर परिषदेसंदर्भात माहिती देण्यासाठी आकाशवाणीच्या पुणे केंद्रात काल वार्ताहर परिषद आयोजित करण्यात आली होती. पुणे आकाशवाणीचे उपमहासंचालक अधीर गडपाले आणि आकाशवाणी पुणे केंद्राच्या प्रादेशिक वृत्त विभागाचे सहाय्यक संचालक माधव जायभाये यावेळी उपस्थित होते. माध्यम आणि मनोरंजन उद्योगात भारताची जागतिक स्तरावर ओळख निर्माण करण्याच्या उद्देशानं माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने वेव्ज परिषदेचं आयोजन केलं आहे, असं गडपाले यांनी सांगितलं. प्रसार भारतीचं वेव्हज् हे ॲप दहा लाखांहून अधिक जणांनी डाऊनलोड केलं आहे. मनोरंजन, शैक्षणिक सामग्री आणि ई-कॉमर्स संबंधीची माहिती देण्यासाठी हे ॲप विकसित करण्यात आलं आहे. दूरदर्शनवरील रामायण, महाभारत यासारख्या गाजलेल्या मालिकांही या ॲपवर पाहायला मिळतील, अशी माहितीही अधिर गडपाले यांनी दिली.

**पाणी परिषद**

पावसाळ्यात भरपूर पाऊस आणि उन्हाळ्यात मात्र पाण्यासाठी पायपीट अशी अवस्था गेली सुमारे पन्नास वर्ष अनुभवणाऱ्या पुणे जिल्ह्यातील खेड, आंबेगाव आणि शिरूर या तालुक्यातील काही गावांचा पाणी प्रश्न सोडवण्यासाठी नुकतीच राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली पाणी परिषद पार पडली. ऐकूया त्याबाबतचा सविस्तर वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून....

**कनेरसर, वाफगाव, चिंचबाईवाडी, वरुडे, माडकवाडी, जऊळके, गुळाणी, जरेवाडी अशा तब्बल 36 गावांमधली सरपंच, ग्रामसेवक यांच्यासह सहा - साडेसहाशे माणसं कनेरसर इथं जमली होती आपला वर्षांनुवर्षांचा पाणी प्रश्न सोडविण्यासाठी ! पावसाळ्यात भरपूर पाऊस पण डिसेंबरनंतर दुबार शेतीला पाणी नाही, मार्च एप्रिल नंतर तर प्यायलाही पाणी नाही. 'धरण उशाला आणि कोरड घशाला' अशी अवस्था भोगत दोन-तीन पिढ्या संपल्या, पण प्रश्न मात्र सुटत नाही. यावर तोडगा काढण्यासाठीच राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या पाणी परिषदेत पाणीपुरवठा,**

**जलसंधारण विभागाचे अधिकारीही तत्परतेने उपस्थित होते. गावकऱ्यांनी आपली गाऱ्हाणी सांगितली आणि अधिकाऱ्यांनी त्यावर मार्ग काय काढता येऊ शकतो हे सुचवलं. जवळच असलेल्या कलमोडी धरणाचे पाणी या गावांमधून जाणाऱ्या वेळ नदीमध्ये सोडलं तर शेतीच्या आणि पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न मिटेल. चासकमान धरणाचा कालवा आणि डिंभे धरणाचा उजवा कालवाही या गावांजवळूनच जातो. तिथे उपसा सिंचन योजना राबवल्या तरी गावांना पाणी मिळेल. त्यामुळे या योजनांबरोबरच कलमोडी धरणाच्या पाणी वाटपाचं फेरनियोजन करावं, अशी मागणी घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर बैठक आयोजित करण्याचं आणि या भागाला न्याय मिळवून देण्याचा आश्वासन यावेळी गोरे यांनी दिलं. दुष्काळी भागातील आमदार म्हणून माण खटावचा कायापालट करण्यासाठी झटणाऱ्या गोरे यांच्या पुढाकारानं गावकऱ्यांनी आपापसातील मतभेद, पक्षीय विचारधारा बाजूला ठेवून या प्राणी प्रश्नासाठी एकजुटीने लढायचा निर्धार यामध्ये व्यक्त केला आणि हे चित्र बदलण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचं आश्वासनही दिलं."…. आकाशवाणी बातम्यांसाठी कनेरसर इथून स्वाती महाळंक.**

<u>**आयपीएल**</u>

आयपीएल क्रिकेट मध्ये काल चेन्नई इथं झालेल्या सामन्यात सनराईजर्स हैदराबाद या संघानं यजमान चेन्नई सुपर किंग्स संघाला 5 गडी राखून पराभूत केलं. चिदंबरम क्रीडा संकुलात हा सामना पार पडला. सनराईजर्स हैदराबाद संघानं 18 षटक आणि चार चेंडूत 155 धावांचं लक्ष गाठलं. आज संध्याकाळी कलकत्ता नाईट रायडर्स आणि पंजाब किंग्स या संघांमध्ये कलकत्ता इथल्या इडन गार्डन मैदानावर सामना रंगणार आहे.

<u>**निधन**</u>

इस्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे माजी अध्यक्ष डॉक्टर कृष्णस्वामी कस्तुरीरंगन यांचं काल बेंगळुरू इथं त्यांच्या राहत्या घरी निधन झालं. ते 84 वर्षांचे होते. पीएसएलव्हीच्या विकासात कस्तुरीरंगन यांची महत्त्वाची भूमिका होती. त्यांच्या कार्यकाळातच चांद्रयानासारख्या मोठ्या मोहिमांचं नियोजन सुरू झालं होतं. त्यांना पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण या नागरी सन्मानांनी गौरवण्यात आलं होतं. डॉ. कस्तुरीरंगन यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केलं आहे.

<u>**हवामान**</u>

मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तसंच विदर्भ आणि दक्षिण कोकणात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि विजांसह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.